आकाशवाणी पुणे

पुणे वृत्तांत

वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

दिनांक – ३०/०३/२०२४ वार – शनिवार

गेल्या सुमारे आठ दिवसांपासून पुण्यातील रात्रीच्या तापमानात मोठी वाढ झाल्यामुळं पुणेकरांची रात्रीची झोप उडाली आहे. शिवाजीनगर भागात सर्वाधिक तापमान वाढ नोंदवली गेली आहे तर कोरेगाव पार्क, वडगाव शेरी भागातही रात्रीच्या तापमानात चांगलीच वाढ दिसून आली आहे. दिवसा ढगाळ हवामानामुळं दमटपणा वाढत चालला आहे. चैत्र पालवीच्या निमित्तानं दरवर्षी पुण्यात दिसणारी रम्य, सुखद गारवा पसरवणारी सायंकाळ यंदा मात्र लुप्त झाल्याचं चित्र आहे.

गेल्या सुमारे २५ वर्षांपासून पुणे लोकसभा मतदार संघातील मतदानाच्या टक्केवारीत सातत्यानं घट होत असल्याच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या कडक उन्हाळयात होणाऱ्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्याचं मोठं आव्हान प्रशासनापुढं आहे. पुण्यात १९६७ मध्ये झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत सर्वाधिक म्हणजे ६९ पूर्णांक ६४ टक्के तर गेल्या लोकसभा निवडणुकीत ५० टक्क्याहून कमी मतदानाची नोंद झाली होती. या पार्श्वभूमीवर यंदाच्या निवडणुकीत ही टक्केवारी वाढवण्यासाठी प्रशासनाकडून जोरदार प्रयत्न सुरू आहेत.

महिला आणि बाल विकास विभाग, स्वीप व्यवस्थापन कक्ष आणि मंथन फांउडेशन पुणे यांच्या वतीनं पुणे लोकसभा मतदारसंघाअंतर्गत शहरातील गुरूवार आणि बुधवार पेठ भागात महिला फेरी काढण्यात आली. जास्तीत जास्त महिलांनी मतदान प्रक्रियेत सहभागी होणाच्या उद्देशाने या फेरीचं आयोजन करण्यात आलं.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन आणि कर आकारणी विभागाच्या वतीनं शहरात मालमत्ताधारकांना कर भरण्यासाठी १७ विभागीय कार्यालयं आणि ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यामध्ये वाकड विभागामध्ये सर्वाधिक ६५ हजार मालमत्ता धारकांनी १४८ कोटी रुपयांचा कर जमा केला आहे. सर्वात कमी तळवडे

विभागामध्ये ८ हजार ९६ मालमत्ता धारकांनी २३ कोटी ३८ लाख रुपये कर भरणा केला आहे. सर्वाधिक ऑनलाइन पद्धतीने ५१३ कोटी ५८ लाख रुपये कर जमा करण्यात आला.

शहरी गरीब वैद्यकीय योजनेच्या सभासदत्वाच्या नुतनीकरणाची प्रक्रिया एक एप्रिलपासून सुरू होणार आहे. गेल्या आर्थिक वर्षामध्ये योजनेतर्गंत असलेल्या कर्करोग आणि डायलिसिसच्या रूग्णांना यंदाच्या आर्थिक वर्षासाठी सभासदत्वाचा नोंदणीसाठी सुविधा देण्याचा निर्णय महापालिका आरोग्य विभागानं घेतला आहे. सभासदांना यंदा नव्यानं उत्पन्नाचा दाखला देण्याची गरज भासणार नाही. सध्या या योजनेअंतर्गत कर्करोगाचे १ हजार २४७ आणि डायलिसिसचे एक हजार २२ रूग्ण उपचार घेत आहेत, अशी माहिती सहायक आरोग्य अधिकारी डॉक्टर मनीषा नाईक यांनी दिली.

पुण्यात केईएम' रुग्णालयातर्फे जागतिक ऑटिझम जागरूकता महिन्यानिमित्त सोमवारी जनजागृती फेरीचं आयोजन करण्यात आलं आहे. दरवर्षी २ एप्रिलला जागतिक ऑटिझम जागरूकता दिवस आणि संपूर्ण एप्रिल महिना ऑटिझम जागरूकता महिना म्हणून पाळला जातो. या फेरीमध्ये सहभागी होण्याचं आवाहन केईएम रुग्णालय प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

पुण्यातील माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयाच्या गीता धनावडे या विद्यार्थिनीची इस्रोच्या "युविका २०२४" अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमासाठी निवड झाली आहे. इयत्ता नववीमध्ये शिकणाऱ्या गीताचा इस्रोकडून घेण्यात आलेल्या ऑनलाइन परीक्षेत संपूर्ण भारतामध्ये सहावा क्रमांक आला. गीताला इस्रोच्या अहमदाबाद इथल्या केंद्रात १२ ते २५ मे प्रशिक्षण देण्यात येईल.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या यशवंत चव्हाण रुग्णालयातील पदव्युत्तर विभाग आणि अतिदक्षता विभागासाठी महाराष्ट्र माजी सैनिक महा मंडळाचे १७ सुरक्षा रक्षक नेमण्यात आले आहे. ही नेमणूक पुढील दोन वर्षासाठी कंत्राटी पद्धतीनं करण्यात आली आहे.

संत विचार प्रबोधिनी आणि डॉक्टर रामचंद्र देखणे साहित्य कला प्रतिष्ठानतर्फे दिल्या जाणाऱ्या स्मृती पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये कीर्तनसेवा पुरस्कार' ह.

भ. प. अमृताश्रम स्वामी महाराज यांना तर लोककला सेवा पुरस्कार' शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनीचे आचार्य हेमंतराजे मावळे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. भावार्थ देखणे यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. पुरस्काराचं यंदा दुसरं वर्ष आहे.

अखिल भारतीय क्रिकेट निवड समितीनं कनिष्ठ गटातील क्रिकेटपटूंची राष्ट्रीय शिबिरासाठी निवड केली असून यामध्ये पुण्यातील १६ वर्षांखालील गटात अथर्व काळे, १९ वर्षाखालील गटात मुलींमध्ये खुशी मुल्ला, भविका अहिरे तर मुलांमध्ये सोहम जामले, अनिरुद्ध साबळे आणि स्वराज चव्हाण, १५ वर्षाखालील गटात निकिता सिंह यांना स्थान देण्यात आलं आहे. ही राष्ट्रीय शिबिरं १९ एप्रिल ते १५ मे या कालावधीत कटक, राजकोट, डेहराडून, रांची, सुरत, नांदेड आणि नागपूर इथं होणार आहेत.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.